महाराष्ट्र टाइम्स

**14th May 2012**

# जागा १३२, अर्ज ३ हजार ५००!

## ड्रॉप इयरनंतर 'एफटीआयआय'वर अर्जांचा पाऊस


म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com


गेल्या वर्षी 'ड्रॉप इयर'मुळे चर्चेत आलेल्या फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटच्या (एफटीआयआय) यंदाच्या प्रवेश परीक्षेला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जास्तीत जास्त मुलांपर्यंत पोहोचण्यासाठी एफटीआयआय प्रयत्नशील असून, इंफाळ, गंगटोक, डेहराडून आणि जम्मू या चार नव्या ठिकाणी परीक्षा केंद्रेही सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे चित्रपट आणि टीव्ही क्षेत्राच्या ग्लॅमरस क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा असलेल्यांचे स्वप्न पूर्ण होण्याची चिन्हे आहेत.

आधीच्या अभ्यासक्रमांचे विद्यार्थी बाहेर न पडल्यामुळे गतवर्षी होस्टेलमधील जागेचा प्रश्न उभा राहिला होता. तसेच अन्य काही



कारणांमुळे अभ्यासक्रम सुरू न झाल्यामुळे एफटीआयआयमध्ये अभ्यासक्रम सुरू होऊ शकले नाही आणि 'ड्रॉप इयर' घोषित करावे लागले होते. त्यामुळे यंदा काय होणार असा संभ्रम असतानाच नव्या वर्षाच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश अर्जांचे वितरण झाले आणि नुकतीच प्रवेश परीक्षाही झाली.

गतवर्षी अभ्यासक्रम सुरू न झाल्यामुळे फिल्म आणि टीव्ही या दोन विभागांसाठी असलेल्या एकूण १३२ जागांसाठी यंदा सुमारे साडेतीन हजार प्रवेश अर्जांची नोंद झाली.

एफटीआयआयचे संचालक धर्मेंद्र नारायण यांनी 'मटा'ला त्याबाबत माहिती दिली. 'गतवर्षीची 'ड्रॉप इयर'ची समस्या दुर्दैवी होती; मात्र तो प्रश्न आता मार्गी लागला आहे. यंदाच्या प्रवेश परीक्षेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. तसेच जास्तीत जास्त मुलांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने यावर्षी इंफाळ, गंगटोक, डेहराडून आणि जम्मू या ठिकाणी चार परीक्षा केंद्रेही वाढवण्यात आली होती. त्याशिवाय परीक्षा पद्धतीतही काही बदल करण्यात आले असून, प्रवेशप्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी करण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्नशील आहोत.

> प्रवेश परीक्षा नुकतीच झाली असून, प्रवेश परीक्षेतून निवडलेल्या विद्यार्थ्यांची आता जुलैमध्ये कार्यशाळा घेण्यात येईल. त्यानंतर मुलाखती घेण्यात येतील आणि सुमारे ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईल.
>
> **प्रकाश मगदूम,**
> रजिस्ट्रार, एफटीआयआय

आतापर्यंतचा अनुशेष २०१३ पर्यंत भरुन काढला जाणार आहे.'